**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक११६९/२००७**

**१) श्री साहेबराव बापूरावजी बढीये,**
**द्वारा एन.टी. डोंगरे, दाते कॅालेज चौक,**
**यवतमाळ, ता.जि. यवतमाळ.**

**अपीलकर्ता**

**<u>वि रु ध्द</u>**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा**
**विशेष पोलीस महानिरीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, मुंबई**
**मधु इंडस्ट्रीज इस्टेट, पहिला मजला, पांडुरंग बुधकर मार्ग,**
**वरळी, मुंबई -४०००१३.**

**३) जन माहिती अधिकारी तथा**
**पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, अमरावती**
**अमरावती परीक्षेत्र, अमरावती.**

**उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक ५.३.२००८ )**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २२.१२.२००६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये व्दितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या व्दितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २१.७.२००६ रोजी (१) श्री एन.एम. पारधी यांच्या विषयी माहितीबाबत. मागील १.४.९५ पासून ३१.३.२००६ पर्यंत मासिक पगाराचे टी.ए./डी.ए./एच.आर.ए./जी.पी.एफ सहित पगाराचे विवरण. (२) जन्मतारीख / पुर्ण नांव (३) मुळ गांव व पत्ता (४) सद्याचा तात्पुरता/कायम स्वरुपी पोस्टल Address (५) फार्म नंबर १६ मागील १० वर्षाचा. माहिती नोंदणीकृत टपालाव्दारे घेणार असे नमूद केले आहे.

३. सदरचा अर्ज हा पोलीस अधीक्षक, A.C.B. कार्यालय यांना संबोधून असून त्यांचे कार्यालयात प्राप्त नाही, असे माहिती अधिकारी यांनी सांगीतले. त्यावर अपीलकर्ता यांना विचारले असता त्यांनी रजिष्टर पत्राने सदरचा अर्ज पाठविला होता. त्याबध्दलची रजिष्टरची पावती दाखविली. परंतु पोच पावती सदरचे रजिष्टर पत्र हे ज्यादिवशी दिले त्या दिवशीचा रजिष्टरचा स्टॅम्प नाही. व सदरच्या पोचची प्रत सुध्दा आयोगाकडे दाखल केलेली नाही. उत्तरवादी यांनी असे सांगीतले की, अपीलकर्ता यांनी त्यांच्याकडे दिनांक २५.८.२००६ रोजी अर्ज दाखल केला होता व त्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक १८.९.२००६ रोजी अपीलकर्ता यांना उत्तर देण्यात आलेले दिसून येते. यावरुन अपीलकर्ता यांनी दिनांक २५.८.२००६ च्या अर्जाची प्रत सुध्दा दाखल केलेली नाही. व त्यांना दिनांक १८.९.२००६ रोजी मिळालेल्या उत्तराची प्रत सुध्दा दाखल केलेली नाही. सदरच्या दिनांक १८.९.२००६ च्या उपलब्ध झालेल्या माहिती मुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक २१.९.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक ४.१०.२००६ रोजी देण्यात आलेला असून वादी यांनी मागीतलेली प्रतिवादी यांची माहितीपैकी संपुर्ण नांवे व पत्ता, जन्मतारीख वादी यांना देण्यास हरकत नाही तसेच वादी यांनी मागीतलेली प्रतिवादी यांची इतर माहिती दिल्यास प्रतिवादी यांच्या खाजगी बाबतीत आगंतुक हस्तक्षेप होण्याची शक्यता असल्याने केंद्रिय शासनाचा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ८(१)(ञ) अन्वये सदर माहिती वादी यांना देणे योग्य होणार नाही, असे आमचे मत आहे असा निर्णय दिलेला दिसून येतो. व सदरच्या निर्णयाने सुध्दा समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी द्वितीय अपील दाखल केल्याचे दिसून येते. सदरच्या द्वितीय अपीलामध्ये पगाराचे विवरणपत्र न दिल्यामुळे फार्म नंबर १६, मागील १० वर्षाचे पगार पत्रकाचे विवरण व फार्म नंबर १६ व इतर माहिती असे दिलेले आहे. परंतु, माहिती अधिकारी किंवा प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिलेल्या कारणा संबंधात कोणत्याही प्रकारचे कारण दिलेले नाही. मात्र  प्रथम अपीलामध्ये भ्रष्टाचाराची तक्रार टिप- श्री पारधे, पोलीस अधीक्षक, A.C.B. यांची तक्रार व मा. उपमुख्य मंत्री यांना करण्यात आली

आहे, एवढेच कारण दिलेले दिसून येते. परंतु, त्यात कोणत्याही प्रकारचे सार्वजनिक व्यापक हिताकरीता ही माहिती मागीतली आहे असे कारण दिलेले दिसून येत नाही.

४. माहिती अधिकारी किंवा प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अधिनियमाचे कलम ८ (ञ) चा आधार घेतलेला आहे. (ञ)- " जी माहिती प्रकट करणे हे व्यापक लोकहिताच्या दृष्टीने आवश्यक आहे अशी राज्य जन माहिती अधिका-यांची किंवा अपीलीय प्राधिका-याची खात्री पटली असेल ती खेरीज करुन जी प्रकट करण्यास कोणत्याही सार्वजनिक कामकाजाशी किंवा हितसंबंधाशी संबंध नाही किंवा जी किंवा व्यक्तीच्या खाजगी बाबतीत विनाकारण हस्तक्षेप करील अशी वैयक्तिक तपशिलासंबंधातील माहिती, " अशी तरतूद आहे. व त्यामुळे श्री पारधी यांचे पगाराची माहिती ही खाजगी माहिती आहे असे समजून ती नाकारण्यात आलेली दिसते. व त्याकरीता अर्थातच सार्वजनिक व्यापक हित हेही अपीलकर्त्यांनी सिध्द करुन द्यावयास पाहिजे. तोंडी सांगीतल्याप्रमाणे त्यांनी स्वतः भ्रष्टाचाराची तक्रार केली असल्यामुळे त्या तक्रारीच्या संबंधात पूरावे गोळा करण्याकरीता त्यांनी ही माहिती मागीतली आहे असे त्यांचे म्हणणे आहे. परंतु, अपीलकर्ता यांच्या विरुध्द अपसंपदाच्या संबंधात गुन्हा दाखल झाला आहे व त्यामुळेच त्यांनी अधीक्षक श्री पारधी यांचे विरुध्द भ्रष्टाचाराची तक्रार ही महासंचालक, A.C.B. व मा. उपमुख्यमंत्री यांचेकडे दाखल केलेली दिसून येते. असे माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा तोंडी सांगीतले. व यावरुनच अपीलकर्ता हे स्वहिता करीता त्यांच्या विरुध्द गुन्हा दाखल केला म्हणून वेठीस धरण्यासाठी माहिती मागत आहे असे दिसून येते. गुन्हा दाखल केला म्हणजे तपास अधिका-यांविरुध्द किंवा फिर्यादीविरुध्दची अनेक अर्ज करुन माहिती मागून वेठीस धरणे, सेवेत मेमो दिला, रजा मंजूर केली नाही, सुटी रजा सवलत मंजूर केली नाही, निलंबीत केले वगैरे कोणतीही शिक्षा प्रस्तावित केली की, त्या सार्वजनिक प्राधिकरणांतील सर्वांची माहिती अनेक अर्ज करुन मागण्याची प्रवृत्ती आढळली व अशाप्रकारे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतूदीचा वापर करणे हे गैरवापर आहे असा निष्कर्ष काढावयास हरकत नाही. व त्यामुळे माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी

यांनी दिलेला निर्णय योग्य आहे असा निष्कर्ष काढावयास हरकत नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांना जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे व इतर माहिती करीता माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी जे कारण दिलेले आहे ते योग्य असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

५) निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ५.३.२००८**

**(विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,**
**नागपूर.**